# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/01/2024 (बुधवार) दुपार


---

## पो.स्टे. कुही हददीतील चिमनाझरी शिवार
## येथे ५२ तासपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या इसमांवर कायदेशीर कारवाई

पोलीस स्टेशन कुही दूरक्षेत्र पाचगाव हददीत दि.०२/०१/२०२४ रोजी दूरक्षेत्र पाचगाव येथील पोलीसांना गुप्त माहितीद्वारा कडून बातमी मिळाली की, मौजा चिमणाझरी शिवार येथे काही जुगारी लोक तासपत्त्यावर पैश्याचा जुगार खेळत आहे. अशा गुप्त माहीती प्रमाणे मौजा चिमणाझरी शिवार येथे पोलीस स्टाफ गेला असता चिमनाझरी शिवारात जुगारी लोक जुगार खेळतांना मिळुन आले. घटनास्थळावरून एकुण ८ **आरोपी नामे १) आकाश रामु गुप्ता, वय २८ वर्ष रा. पाचपावली २) अजय मारोतराव भोरकर वय ४२ वर्ष रा. भांडे प्लाट नागपुर ३) गजानन निलकंठ रंगारी वय ४० वर्ष रा. टिमकी नागपूर ४) महेश दशरथ पौनीकर, वय ३७ वर्ष रा. जुनी मंगळवारी नागपूर ५) ओमकार दिगांबर निनावे, वय ३३ वर्ष रा. टिमकी नागपूर ६) साहील गणेश पराते वय २३ वर्ष रा. जुनी मंगळवार नागपूर ७) कुंदन शंकर इंगोले वय २९ वर्ष रा. जुनी मंगळवारी नागपूर ८) संतोष धनराज घोडमारे वय ४४ वर्ष रा. गिट्टीखदान नागपूर** यांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यातून डावावर नगदी ३३,८३५/—रु. व अंगझडतीत ८१,८६०/—रू असा एकुण नगदी रोख रक्कम कि १.१५,६९५/—रू. एकुण ६ मोबाईल किंमती ४३,६५०/—रू. ५२ तासपत्ते २ नग कॅट किंमती १२०/—रु. असा एकुण १,५९,४६५/—रू. चा माल मिळून आला. आरोपी विरूध्द पो. स्टे. कुही येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक महेश भोरटेकर पोलीस स्टेशन कुही, पोलीस उपनिरीक्षक हरीहर सोनकुसरे, पोलीस हवालदार दिलीप लांजेवार, चांगदेव कुथे, पोलीस अंमलदार संदीप सहारे व चालक सहायक फौजदार संजय कानडे यांनी संयुक्तरित्या पार पाडली.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोस्टे रामटेकः—** अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा नगरधन येथे दिनांक ०१/०१/२०२४ चे २०.३० वा. २०.५० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— नारायण चंद्रभान कुंभलकर, वय ४२ वर्ष, रा. साटक हा त्याचे २ मित्रासह सुरेश कामडी यास नगरधन याचे अमरज्योती रेस्टॉरेंट अॅड बारचे नवीन बांधकाम झाल्याने ते बांधकाम पाहण्या करीता गेले असता व बार मधुन बाहेर निघाले असता तेथे दारू पित बसलेले दोन ईसम हे फिर्यादी जवळ आले व ''तु माझेकडे घुरावुन का पाहतो कोण आहे तु थांब तेथे'' असे म्हणुन झगडा भांडण करून कॉलर पकडुन हातबुक्यांनी तोंडावर, नाकावर मारहाण केली तेव्हा बारमालकने झगडाभांडण सोडविले व ते ईसम ''अबे साले तु थोडा देर तक रूक तुझे खतम करता हु'' असे म्हणुन निघुन गेले व परत आले तेव्हा **आरोपी क्रमांक १) राजेन्द्र उर्फ टायगर** याच्या हातात तलवार होती त्याने ती तलवार फिर्यादीचे डोक्यावर मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा आरोपीचा वार हुकवुन फिर्यादी बाजुला सरकला तेव्हा **आरोपी क्रमांक २) अजय रमेश बंधाने दोन्ही रा नगरधन रामटेक** याने फिर्यादी कडे येवुन म्हटले की ''टायगर ईसको खतम करते है मै ईसको पकड के रखता हु.'' तेव्हा आरोपी क्र. १ ने पुन्हा मारण्यासाठी तलवार

उचलली तेव्हा फिर्यादी सोबत असलेले २ मित्र व बार मालक याने फिर्यादीला पकडून वाचविले व गावातील काही लोक जमा झाले व जमा झालेल्या लोकांनी त्यांना पकडले तसेच फिर्यादीचे प्राथमिक उपचार करून नागपुरला रेफर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०७, ५०६, ३४ भादंवी सहकलम ४, २५ शस्त्र अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मा. श्री. आशीत कांबळे, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग, पोलीस निरीक्षक यादव पो.स्टे. रामटेक तसेच पोलीस उपनिरीक्षक लांजेवार पो.स्टे. रामटेक यांनी भेट दिली असुन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नारायण भोयर मो. क्र. ८३२९६१७०३९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर